**सं.फौ.प्र.क्र. २२८/२०१८**
**सरकार –वि– सचिन**
**नि.क्र.११ वर पुढे सुरू**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१०,
मी शपथेवर खरे सांगतो की,
नावः — राजकुमार रघूनाथ चांदेवार, वय– ५८ वर्ष,
कामधंदा – सेवानिवृत्त, रा. शिवाजी नगर, पवनी, तह. पवनी, जि. भंडारा.

**<u>साक्षीदाराचा सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी अधिवक्ता श्री. तौसिफ खान यांच्यामार्फत–</u>**

१. मी साकोली पोलीस ठाण्यामध्ये सन २०१६ पासून २०२२ पर्यंत पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होतो. दिनांक १६/११/२०१७ रोजीच्या २०.०० वाजेपासून ते १७/११/२०१७ रोजीच्या सकाळी ०८.०० वाजेपर्यंत डी.ओ. ड्युटीवर कार्यरत असतांना साकोली येथील उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून वैद्यकीय मेमो प्राप्त झाला. त्यानुसार पोलीस ठाण्याला रितसर नोंद घेण्यात आली. नोंद घेतल्यानंतर मी उपजिल्हा रुग्णालयात जावून वैद्यकीय अधिकारी यांना लेखी पत्रव्यवहार केला. सदरच्या पत्राची कार्बन प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्यास **निशाणी क्र.३१** देण्यात येते. तेथील जखमी निखील चिरवतकर यांना भंडाऱ्याला उपचाराकरीता पाठविण्यात आले होते. तसेच जखमी शुभम चिरवतकर हा तिथे हजर असल्याने त्याचे बयाण नोंदविण्यात आले. मला अभिलेखावरील जखमी शुभमचे बयाण दाखविण्यात आले. ते निशाणी क्र.१२ वर आहे. ते बयाण त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविण्यात आले होते. त्यानंतर वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून दोघांचे एम.एल.सी. रिपोर्ट प्राप्त केले होते. सदरचे एम.एल.सी. रिपोर्ट निशाणी क्र.२७ व २८ वर आहेत. त्यानंतर पोलीस ठाण्याला मोटारसायकल क्र. एम.एच.३६/टी.५२०९ च्या चालकाविरुध्द गुन्हा दाखल केला. आता मला अभिलेखावरील छापील खबर दाखविण्यात आली. त्यावर माझी दाखल अधिकारी म्हणून सही असून मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.३२** देण्यात येते.

**<u>सरतपास समाप्त.</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे अधिवक्ता श्री. एस. सी. बोरकर यांच्यातर्फे सुरु–</u>**

**२.** हे म्हणने खरे आहे की, मी भंडारा येथील रुग्णालयात जावून काही विचारपूस केली नाही. मी गेलो तेव्हा तिथे एकच जखमी होता केवळ त्याचेच बयाण मी नोंदविले. कुणाच्या चुकीमुळे अपघात झाला हे मी सांगू शकत नाही परंतू बयाणाच्या आधारे मी गुन्हा दाखल केला. हे म्हणने खरे नाही की, मी चुकीच्या माणसावर गुन्हा नोंदविला. हे म्हणने खरे नाही की, मी खोटा गुन्हा दाखल करुन घेतला. हे म्हणने खरे नाही की, मी वैद्यकीय अधिकारी यांना पत्र दिल्याचे खोटे सांगतो आहे. हे म्हणने खरे नाही की, खोटे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. हे म्हणने खरे नाही की, खोटा गुन्हा मोटारसायकल चालकाविरुध्द दाखल करुन घेतला. हे म्हणने खरे नाही की, आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**
**<u>फेरतपास काही नाही</u>.**

समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत

VISHAL MAHANAND GAIKWAD
Digitally signed by VISHAL MAHANAND GAIKWAD
Date: 2026.01.17 16:10:54 +0530

**(वि. म. गायकवाड)**
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, साकोली.
१७/०१/२०२६